# सींघु संस्कृतिकालीन 'पणी': एक गोर बंजारा जमात

*रवीकुमार संभाजी राठोड ** प्रा. डॉ. व्ही.एल. कालेकर
*** प्रा. डॉ. चव्हाण पंडित लक्ष्मणराव

जगाच्या पाठीवर अनेक मानवी समुह आहेत. काळात बदल होऊनही प्रत्येक मानवी समुहानी आपली ओळख जमेल त्या प्रमाणात व जमेल तशी जपुन ठेवलेली आहे. मानवाच्या जीवन ओघामध्ये अनेक संस्कृत्या या भुतलावर उदयास आल्या, काही काळाच्या ओघामध्ये नष्ट झाल्या, काही खंडहरे होऊन इतिहासाची साक्ष देत उभ्या आहेत. अशीच एक भारताच्या सिंध प्रातांतील रेल्वे पटरी टाकण्याच्या खोदकामात 1921 साली सापडलेली सिंधु संस्कृती आहे. सिंधु संस्कृतीच्या उदय व आस्ताबाबत विविध मत प्रवाह आहेत. कोणास ती वैद्यिकाची संस्कृती वाटते, कोणास ती अनार्याची संस्कृती वाटते तर कोणास ती स्वतंत्र संस्कृती वाटते.

**उद्दिष्ट्येः**—संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत. 1. पणी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभुमी शोधने. 2. पणी जमातीच्या व्यापाराचा आढावा घेणे. 3. पणी व गोर (बंजारा) यांचा संबंध शोधने. 4. सिंधु कालीन देवता व गोर (बंजारा) देवता यांच्यातील साम्य शोधने. 5. गोर (बंजारा) जमातीची ऐतिहासिक पार्श्वभुमी शोधने.

**गृहितकृत्येः**— संशोधनासाठी खालील गृहितकृत्ये मांडण्यात आलेली आहेत. 1. पणी ही सिंधु संस्कृतीकालीन जमात आहे. 2. पणी ही व्यापारी जमात आहे. 3. सिंधु कालीन सप्तमात्रका गोर (बंजारा) जमातीत साती सगळती म्हणून पुजतात. 4. पणी व गोर (बंजारा) यात साधर्म्य आहे. 5. गोर (बंजारा) जमातीचा इतिहास सिंधु संस्कृती पर्यंत मागे जातो.

**संशोधन पद्धतीः**—प्रस्तुत संशोधनात अभिलेखांचा ऐतिहासिक आधार सामुग्री म्हणून उपयोग करण्यात आलेला असुन लिखित साहित्यांचा आधार घेण्यात आलेला आहे. संदर्भ ग्रंथाचा उपयोग करून तंथ्य संकलन करण्यात आलेले आहे. विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अध्ययन पद्धतीचा उपयोग करून अध्ययन करण्यात आले आहे. संशोधनाच्या अंती संशोधन सारांश मांडण्यात आला आहे.

**सिंधु संस्कृतीः**— सिंधु संस्कृती ही राज्यस्थान, हरीयाणा, पंजाब, सिंद्ध, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटकातील काही भाग या परिसरात विस्तारलेली आहे. गॉर्डन चाइल्ड याचे असे मत आहे की सुमेरीयण संस्कृती मोहनजोदडो येथूनच आली असावी. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, मोहनजोदडो शहर भरभराटीला आले होते, त्या वेळी आर्य लोक हिंदुस्थानात आद्यापही आलेले नव्हते. सर जॉन मार्शल यांचे मत उदृत करतांना पुढे नेहरू असे सांगतात की "अशा रीतीने काही अगदी थोडे प्रमुख मुद्दे सांगावयाचे म्हटले, तर या काळी कापसाचा कापडाच्या कामी उपयोग करण्याची कला केवळ हिंदुस्थानांतच काय ती अस्तित्वांत होती. आणि पश्चिमेकडील जगात तिचा प्रसार होण्याला त्यानंतर 2–3 हजार वर्षे जावी लागली. त्याप्रमाणे इतिहासपुर्वकाळच्या ईजिप्तमध्ये, मेसापोटेमियामध्ये किवा पश्चिम आशियामध्ये अथवा इतर कोठेही आपल्याला मोहंजोदारोमधील नागरिकांच्या घरांसारखी प्रशस्त व सोयीस्कर घरे किवा तेथील सुंदर व मजबुत बांधणीच्या स्नानगृहासारखी स्नानगृहे काही आढळून येत नाहीत. त्या देशामध्ये, देवांची विशाल व सुंदर मंदिरे किंवा राजांचे राजवाडे आणि थडगी ही बांधण्याकरिता पुष्कळ पैसा उधळण्यात आलेला आढळतो, पण बाकीच्या लोकांना मात्र मातीच्या अगदीच भिकार निवासस्थानावर संतुष्ट राहावे लागत असावे असे दिसते.

**सिंधु संस्कृतिकालीन जमातीः**—हडप्पा, मोहनजोदाडो व चन्हुजोदाडो येथे सापडलेल्या 50 मानवी अवशेषांच्या परिक्षणावरून हे सिद्ध झाले आहे की हे अवशेष वेगवेगळ्या जमातीच्या लोकांचे आहेत. इतिहासकाराच्या मते, हडप्पा संस्कृतीचे लोक प्रमुख 4 जमातीचे होते असे स्विकारण्यात आले आहे. 1. प्रोटोआस्ट्रेलायड, 2. भुमध्यसागरीय, 3. मंगोलियन, 4. अल्पाइन या सगळ्या जमातीमध्ये भुमध्यसागरीय जमातीचे लोक बहुसंख्याक होते.

**सिंधु संस्कृती कालीन सामाजिक जीवनः**— येथील उत्खनणात स्त्रियांच्या मुर्त्या मुबलक प्रमाणात सापडल्या आहेत. सिंधु संस्कृती ही मात्रसत्ताक संस्कृती म्हणून विख्यात होती. कार्य कुशलतेच्या आधारावर बुद्धीजीवी, योद्धा, व्यापारी, कारागीर व श्रमिक अशा प्रकारचे वर्ग होते. हे असुनही या समाजामध्ये वर्ग—भेद व उच्य—निच्यता असल्याचे कुठेही सापडत नाही. अनेक मुद्रावर मासा व शिकरीचे दृश्य आहे यावरून हे लोक मांसाहारी होते. नारळ, खजुर, लिंबु, टरबुज, गहू, तांदुळ, तिळ, मोहरी इत्यादी बाबत त्यांना माहिती होती. शेळी, वराह व कुकूट पालन या लोकांना परिचित होते.

**वेशभुषाः**—पुरूष कमरेभोवती धोतर नेसत व डाव्या खांदयावर उपरणे टाकत. स्त्रीया गुढघ्या इतका घागरा घालीत व ओढणी वापरत. कपडे कापुस, लोकर व ताग या पासुन बनवलेले

* विद्यार्थी, स्वा. रा.ती.म.वि. नांदेड
** वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड

असत.

**अलंकार व प्रसाधनेः—** स्त्री—पुरूष अलंकार वापरत. हार, अंगठी, बाजुबंद, केसांचे आभूषण हे अलंकार सगळेच वापरत. स्त्रिया नाकात नथ, कानात कुंडल, हातात चुडी व पायात पायल असे अलंकार वापरत. पुरूष छोटी दाढी व मिशी ठेवत. केसाला पाठीमागे वळवत असत. स्त्रीया केस शेंडीच्या ठिकाणी जमवुन त्याचा बुचडा बांधत असत. स्त्रीया अंगावर गोंदवुन घेत असत.

**मनोरंजनः—**द्युत क्रिडा, सारीपाट, शिकार, पोहने, कुस्ती खेळणे, नृत्य करणे इत्यादी प्रकार मनोरंजनासाठी वापरले जात. अनेक शिक्यावर विना, ढोल व नर्तकी यांचे चित्र सापडले आहेत.

**अवजारेः—**सुत—कताई, सुई, हस्तीदंत, चाकु, कु—हाडी, सुरी, आरी, मास्या पकडण्याचा गळ इत्यादी अवजारे कासे व तांबे यापासुन बनवत.

**धार्मीक जीवनः—**सिंधु संस्कृतीच्या काळात मातृ देविची पुजा केली जात असे, पुजेत पशु पक्षाचा बळी दिला जाई. मुद्रांचा उपयोग ताईता सारखा केलेला असे. या लोकांचा मंत्र तंत्र व जादु टोणा यावर विश्वास होता. लिंग व योनी यांच्या आकाराच्या मिळालेल्या शिल्पावरून लिंग पुजेला मान्याता होती. एका स्त्री लिंगामध्ये लिंबाचे झाड असलेली मुद्रा सापडलेली आहे. असंख्य मुद्रानवरती 'जीवन वृक्षाचे' अंकण केले आहे.

**प्रेत विसर्जनः—**प्रेत विसर्जनाच्या तीन पद्धती अस्तित्वात होत्या. 1. दफन : थडग्यामध्ये मृतास निजवीत व त्याच्याभोवती त्याचे अलंकार, आयुधे, भांडी इत्यादी पुरीत. 2. अंशदफन : मृताचे शरीर पशुपक्ष्यांना खावयास देत व नंतर मृतास्थी अस्थिपात्रात ठेवुन पुरीत. 3. दहनोत्तर दफन : प्रेत दहन करून मृतास्थी गोळा करून त्या मृण्मय पात्रात ठेवून ते पात्र पुरीत व राख नदीच्या पात्रात विसर्जन करीत.

**व्यवसायः—**सिंधु संस्कृती अंर्तगत वेगवेळ्या वस्तुंचे व्यापार करण्याची पद्धत होती. नद्याच्या मार्गे व रस्त्याच्या मार्गे अंर्तगत व्यापार केला जात असे व विदेशात समुद्र व रस्त्याच्या मार्गे व्यापार केला जात असे. उत्खनणात अनेक विदेशी वस्तु सापडलेल्या आहेत.

**सिंधु संस्कृतीचा —हासः—**सरस्वती नदी लुप्त झाल्यामुळे जन—जीवन विस्कळीत झाले. सिंधु नदीला आलेल्या महापुरामुळे नगरे पाण्याखाली गेली. जागतीक व्यापाराचे प्रमुख केंद्र बनल्यामुळे अनेक समृद्ध मानवी समुह या संस्कृतीकडे आकर्षिले गेले. जसाही परदेशी लोकांचा प्रभाव वाढला स्थानिक व परदेशी यांच्यात संघर्ष होऊन परदेशी लोकांची सरसी झाली. असी विविध कारणे सिंधु संस्कृतीच्या पतणाबाबत सांगितली जातात.

**पणीः—** सिंधु संस्कृतीकालीन मानवी समुहात पणी नावाची एक जमात अस्तित्वात होती. व्यापाराचा व्यवसाय करणारी 'पणी' ही एक जमात आहे. पण म्हणजे व्यापार हा व्यापार करणारी जमात म्हणजे पणी होय. हडप्पा, मोहनजोदारो, कालीबंगा आणि लोथल या प्रमुख नगरामध्ये या जमातीचे अस्तित्व होते. सिंधु नदीच्या काठी असलेले हडप्पा, मोहनजोदारो व कालीबंगा येथून त्यांचा व्यापार भुमि व नदयाच्या मार्गे चालत असे तर लोथल येथुन समुद्राच्या मार्गे चालत असे. सिंधु संस्कृतीच्या काळात व्यापाराच्या माध्यमातुन समृद्ध झालेली ही जमात सिंधु संस्कृतीच्या पतणानंतर विस्थापित झाली. उदरनिर्वाहाच्या कारणाने विविध ठिकाणी भटकत राहीली. संधी मिळेल तिथे स्थिरावली. हडप्पा पतनानंतर पणींचा एक गट लेबनॉन मध्ये विसावला, त्यास फिनिसीयन म्हणतात. पणी—पट्टणचा अर्थ पाहताना पणी म्हणजे व्यापारी जमात व पट्टण म्हणजे सर्व सोयीयुक्त समुद्र व नदी किना—यावरील बंदर म्हणून पणी—पट्टण म्हणजे व्यापार करणा—या जमातीचा सर्व सोयीयुक्त समुद्र व नदी किना—यावरील व्यापारी केंद्र होय. असा उल्लेख जातक साहित्यात सापडतो.

**पणी व गोर यांचा संबंधः—**पाच हजार वर्षापूर्वी भुमध्य समुद्राच्या किनारपट्टीवर आपली समुद्र वसाहत पणीने उभारली. येथूनच सारा युरोपीय बाजार पणीने एकवटला होता. तेराशे वर्ष जागतीक व्यापारात ते एकमेव स्वामी होते. पणी लोकांची संस्कृती किंवा परंपराचा अभ्यास केल्यावर असे समजते की, गोर (बंजारा) जमात 'पणी' जमातीची एक शाखा असावी असे इतिहासकार प्र.रा.देशमुख नोंदवितात. या गोर (बंजारा) साहित्यात 'पणी' पनेडो असा वारंवार उल्लेख आढळतो. या समाजातील एका प्राचिनतम म्हणीनुसार

''म पणी छुं, हरपणी छुं,/धरतीन जणी छुं, लावलश्करेर धणी छुं''

याचा अर्थ मी पणी म्हणजे व्यापारी आहे. हरपणी छुं म्हणजे या पृथ्वीवर निर्माण झालेली हरबाब मी निर्माण केली आहे. लावलष्करेर धणी छुं म्हणजे या सर्वबाबीचे रक्षण करण्याचे हक्क माझ्याकडे आहे. ऋग्वेदातील उल्लेखीत 'पणी' म्हणजे आजचा मलाण किंवा गोर (बंजारा) हे सीद्ध करण्यास सरमा व पणी यांच्या संवाद सुक्तातील 10,108.1—10 कलमाचा आधार घेता येतो. पणीच्या भाषेसारखीच भाषा गोर (बंजारा) जमातीत बोलली जाते. वैद्यिक कालखंडातील पणी पुरूषांची नावे—वाला, भोजा, सोना, बबरू, तेजा, रेका, हेमा, खेमा, जेता असी नावे गोर (बंजारा) पुरुष आजही धारण करतो.

**सिंधु संस्कृती व गोर (बंजारा) यांचा संबंधः— समाज जीवनः—**सिंधु संस्कृतीकालीन मानवी समुहाकडे असलेल्या समाज जिवनाच्या अनेक खुणा गोर (बंजारा) जमातीमध्ये आढळतात. गोर (बंजारा) जमातीमध्ये मरीयामा या देवतेची पूजा केली जाते. ही पूजा जमिन सारवुन त्यावर पीटाने गोल रिंगन करून व आत चौकोण मारून त्यात मध्य भागी पाण्याने भरलेला तांब्या ठेवला जातो. त्या तांब्यामध्ये लिंबाची फांदी टाकुण त्यास देवता संबोधण्यात येते. या देवते पुढे बकरे, कोंबडे, रेडा इत्यादी प्राण्याचा बळी दिला जातो. ही खुण व बळी देण्याची पद्धत सिंधु कालीन स्त्री योणीतील झाड दर्शविण्या—या मुद्रेसी व पूजेस साम्य सांगणारी आहे. गोर (बंजारा) जमातीतील बहुतांशी लोक मांसाहरी आहेत.

**वेशभुषाः—**गोर पुरूषामध्ये धोतर नेसण्याची व खांद्यावर उपरणे घेण्याची पद्धत आहे तर स्त्रीया घागरा ओढणी हे वस्त्र

नेसतात. हा पेहराव सिंधु कालीन पेहरावासी मिळतो.

**अलंकार व प्रसाधने**:—गोर (बंजारा) जमातीच्या गळयात हार, चारी बोटात अंगठी, नाकात भुरीया, कानात कुंडल, हातात चुडी व पायात झांजर हे स्त्रीयांचे अलंकार असुन पुरूष दाढी मिशी व डोक्यावर झलपा ठेवतात. स्त्रीया सर्व केश एकत्रीत करून शेंडीच्या ठिकाणी आटी बांधतात व अंगावर गोंदवुण घेतात. ही सर्व अलंकार व प्रसाधन पद्धती सिंधु कालीन अलंकार व प्रसाधन पद्धतीसी मिळती जुळती आहे.

**मनोरंजन**:—गोर (बंजारा) जमातीतील लोक पासा, बातु, येड, नाचणो, गावणो, भजन इत्यादी प्रकाराने मनोरंजन करतात. पासा म्हणजे द्युत क्रिडा, बातु म्हणजे कुस्ती, येड म्हणजे शिकार, नाचणो म्हणजे नृत्य, गावणो म्हणजे गायन या सर्व बाबी सिंधु कालीन जमातीसी मिळतात.

**धार्मिक जीवन**:—''मारी चिणा पट्टणेरी माई, साती भेनेन खबर कळाई चिना पट्टणेरी आई याडी मरीयामा माई'' गोर (बंजारा) जमातीचे कुलदैवत असलेली 'मरीआई' आपल्या सात बहीणीला संबोधन करते. सिंधु काळात या सप्तमात्रका/साती आसरा या नावे जलमात्रका म्हणून पूजल्या जात. या मात्रका साथी सगळती म्हणून आजही गोर (बंजारा) जमातीत पूजल्या जातात. सात देवी किंवा सातबहीणी हे कुटूंबातील मरीआईला संबोधन केले आहे.

**प्रेत विसर्जन**:—गोर (बंजारा) जमातीत प्रेत विसर्जन 2 पद्धतीने केले जाते. 1. दफन : अविवाहीत मृत स्त्रि—पुरूषास दफन केले जाते. 2. अग्णी संस्कार : विवाहीत मृत स्त्री—पुरूषास अग्णी दिला जातो व राख नदीच्या पात्रता विसर्जीत करतात. हे प्रेत विसर्जन सिंधु संस्कृतीस संबंध सांगते.

**व्यवसाय**:— नजीर हा मुळ इराणचा कवि भारतात गुजरातेत स्थायीक झाला व तेथेच इ.स. 1023 मध्ये मृत्यू पावला. त्याची एक गजल आहे.

**सब ठाठ पडा रह जायेगा । जब लाद चलेगा बंजारा**

एने अकबरीत इ.स. 1396 साली फार मोठा दुष्काळ उत्तर हिंदुस्थानात पडल्याचा उल्लेख आहे. त्या दुष्काळाचे वेळी हजारो लोक अन्नासाठी तडफडून मरत असतांना गोर (बंजारा) जमातीने दुरवरच्या देशातून, प्रांतातून अन्नधान्याचे तांडे आणून या लोकांच्या प्राणरक्षणात मदत केल्याचा उल्लेख आहे. इ.स. 1417 मध्ये फिरोजशहा बहामनीचा भाऊ खानखानान याने पुष्कळ गोर (बंजारा) जमातीचे बैल धरून आणले असल्याची माहिति फेरिस्ता देतो. त्यावेळी गोर (बंजारा) जमातीचे लोक दक्षिणेत सर्वत्र हिंडून धान्याचा व्यापार करीत. सोळाव्या शतकातील शाही व्यापारी लाखा बंजारा यांच्याकडे 1 लक्ष बैलांचा तांडा होता. त्याचा व्यापार अतंर्गत व परदेशातही होत असे. तो गुरू तेगबहादुर यांचा समकालीन होता. केंबरलेज यांनी 1882 साली लिहीलेल्या बंजारा स्क्रिप्टनुसार इ.स. 1630 साली शहाजहॉंनचा वजीर असफखॉन याच्या बरोबर जंगी व भंगी हे गोर (बंजारा) जमातीचे व्यापारी दक्षिणेत आले. त्यांच्याकडे 1लाक्ष 80 हजार बैल होते. सेवार्थ त्यांना असफखॉनने तांब्रपट दिला होता.

**रंजन का पानी ।/छप्पर का घास ।/दिनके तीन खुन माफ ।/और जहा आसफखाके घोडे ।/वहा भंगी जंगी के बैल खडे ।/**श्रीरंगपट्टनास मार्क्विस ऑफ कॉर्न वालीसने वेढा दिला होता, तेव्हा इ.स. 1791—92 मध्ये इंग्रज सैन्यास धान्याचा पुरवठा करण्याकरिता गोर (बंजारा) जमातीच्या लोकास नियमितपणे कंत्राट दिले जात असे. 1886 मध्ये लिहलेल्या निमार सेटलमेंट रिपोर्ट नुसार रेल्वेमुळे गोर (बंजारा) जमातीचा व्यापार बसला असा निष्कर्ष आहे. पुढे 1871 मध्ये गुन्हेगारी जमाती कायदा झाला आणि गोर (बंजारा) जमात पुर्णपणे मुख्य प्रवाहातुन बाहेर फेकली गेली. त्याची व्यापाराची नाळ सिंधु संस्कृतितील व्यापारी जमातीस जाऊन मिळते.

**सारांश**:— सिंधु संस्कृती ही समृद्ध व कर्तृत्ववान जमातीची संस्कृती होती. सुमेरीयन संस्कृतीचा उदय ही सिंधु संस्कृतीतुन झाला असे गॉर्डन चाइल्ड याचे मत आहे. इजिप्त व पश्चिम संस्कृतीपेक्षा या संस्कृतीने मानवास उत्तम जीवन दिले असे जॉन मार्शल यांचे मत आहे. सिंधु संस्कृतीकालीन जमातीमध्ये 4 प्रमुख जमातीचे लोक होते. यात भुमध्यसागरीय जमातीचे लोक संख्येने जास्त होते. वेशभुषा, अलंकार, मनोरंजन व धार्मिक जीवन याबाबत ही संस्कृती परिपुर्ण होती. रस्ते, नद्या व समुद्रमार्गे अतंर्गत व विदेशात तत्कालीन जमातीचे लोक व्यापार करत असत. व्यापारातुन मिळालेली समृद्धी व त्यातुन निर्माण झालेल्या संघर्षातुन सिंधु संस्कृतीचा —हास झाला.

## सन्दर्भ ग्रन्थ

1. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृती कोष, खंड—10, भारतीय संस्कृतीकोष मंडळ पुणे, 2002. 2. प्रा. निरज साळुंखे, दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र, लोकायत प्रकाशन, सातारा, 2002. 3. डॉ. मोहन लक्ष्मणराव चव्हाण, बंजारा बोली भाषा एक अध्ययन, सुर्या प्रकाशन, कानपुर, 2007. 4. सुशीला चत्रेकर, मराठवाड्यातील पारंपारीक फीरस्त्यांची लोकगीते, स्वा.रा.ती.म.वी. नांदेड, शोध प्रबंध, 1997. 5. डॉ. शरद हेबाळकर, भारतीय संस्कृतीचा विश्वसंचार—भारतीय विचार, साधना प्रकाशन, पुणे, 1999. 6. प्रा. बबन पवार, स्वामी रामांनद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ परीक्षेत्रातील बंजारा समाजाचा सांस्कृतीक अभ्यास, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, इतिहास विषयातील शोध प्रबंध, 2005. 7. भारतीय अर्थव्यवस्था का इतिहास व्यापार एवं बाजार, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, सामाजिक विज्ञान विद्यापीठ, नई दिल्ली, 2005. 8. डॉ. श्रीराम एस.पी., पारंपारीक गोरबंजारा स्त्री काशिदकारी भरतकाम व हस्तकला, गराशा प्रकाशन, अंबाजोगाई. 2004 9. प्रा. बद्रायणी ब.गो., प्राचीन भारतीय संस्कृती दर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भाडार कोलापुर, 1960.. 10. रश्मि पाठक, प्राचिन भारत का सामाजीक इतिहास, अर्जुन पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली, 2003. 11. प्रा. र.ना. गायधनी, प्राचिन भारताचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन पुणे, 2001. 12. रिता शर्मा, प्राचिन भारतका इतिहास, बोहरा प्रकाशन जयपुर, 1996. 13. द्विजेन्द्र नारायण झा, प्राचिन भारतका इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली, 2004. 14. पंडित जवाहरलाल नेहरू, जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 2008. 15. आत्माराम कनिराम राठोड, गोर बंजारा इतिहास व लोकजीवन, गोरवट प्रकाशन पुसद, 1994 16. बळीराम हिरामण पाटील, गोर बंजारा लोकांचा इतिहास, बळीराम पाटील स्मारक समीती यवतमाळ, 1973 17. Sir Mortimer Wheeler, The Indus Civilization, Cambridge at the University Press 1968